**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र १९४** **दिनांक १६/०७/२०२१**

## गांजा या अमली पदार्थाची विक्री करणा-या ०२ इसमांवर कारवाई करुन गांजा हस्तगत करण्यास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकास यश.

दि. १४.०७.२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर चे वपोनि. श्री पाटील व पथक मिरारोड परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना, सरदार वल्लभभाई पटेल स्कुल समोरील रोडवर, शिवारगार्डन, मिरारोड (पुर्व) जि. ठाणे या ठिकाणी एक इसम मोटार सायकलचे हँडलला उजव्या बाजुस एक पांढ-या रंगाची पिशवी अडकवुन संशयितरीत्या उभा असल्याचे निदर्शनास आल्याने त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, **त्याने त्याचे नाव विनयकुमार ब्रम्हदेव पाठक वय २२ वर्ष रा. मुन्सी कम्पाऊंड, काशिमीरा** असे सांगितले. सदर इसमाची व मोटर सायकलचे हॅन्डलला अडकविलेल्या पिशवीची तपासणी केली असता, पिशवीमध्ये **०२ किलो १६ ग्रॅम** वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने सदर बाबत प्राथमिक विचारपूस केली असता, त्याचे ताब्यात मिळुन आलेला गांजा हा अंमली पदार्थ त्याने त्याचा साथीदार प्रतिक पटेल रा. भाईंदर पूर्व याचेकडून घेतल्याचे सांगितलेने लागलीच प्रतिक पटेल याचा भाईंदर पुर्व परीसरात शोध घेवून त्यास ताब्यात घेतले त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **प्रतिक कनुभाई पटेल वय २९ वर्ष रा. भाईंदर पूर्व, असे सांगितले. सदर इसमाचे झडतीमध्ये २ किलो ३७५ ग्रॅम** अंमली पदार्थ, गांजा मिळुन आला.

वर नमुद दोन्ही इसमांचे ताब्यात एकुण ४ किलो ३९१ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ, मोटर सायकल व रोख रक्कम असे एकूण १,६४,८००/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. २४४/२०२१ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क), २०(ब) प्रमाणे दाखल आहे.

सदरची कारवाई श्री डॉ. महेश पाटील पोलीस उप.आयुक्त(गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे),यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पोलीस अमलदार उमेश पाटील,विजय निलंगे,रामचंद्र पाटील,वैष्णवी यंबर, कमल चव्हाण, केशव शिंदे व चालक सम्राट गावडे यांनी केली आहे.

--------------oooooooooo-----------------